MHKO090001382011

रे.क.नं ६४/२०११

नि. ५५ च्या अर्जावर आदेश

१ सदरचा अर्ज अबेटमेंटचा आदेश रद्द करणेसाठी दाखल केला आहे. वादीचे थोडक्यात कथन असे की, सदर कामातील वादी नं. ३ श्रीमती सिताबाई रामा तेजम ही दि. १३.०१.२०१४ रोजी मयत आहेत. वादी नं.१४. श्री. पांडू गुंडू चांदेकर दि.२३.०१.२०१८ रोजी मयत आहेत. वादी नं.१८ धोंडी हरी माडभगत दि.१४.१०.२०१२ रोजी यमत आहेत. वादी नंबर ३ चे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी ४ वर्षे ८ महिने १ दिवस व वादी नंबर १४ चे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी ६ महिने २२ दिवस तसेच वादी नंबर १८ चे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी ५ वर्षे १० महिन्याचा विलंब झालेला आहे. तरी सदरचा विलंब माफ होवून अबेटमेंटचा आदेश रद्द करावा अशी विनंती केली आहे.

२. वादी यांनी वारस रेकॉर्डवर आणणेसाठी जाणून बुजून टाळाटाळ केली नाही. वादीतर्फे वटमुखत्यार यांचा जबाब तयार करत असाताना सदर वादी मयत झाले आहेत असे समजले. तसेच वादी हे आजारी असल्याने त्यांना इतर वादी यांच्या बाबत माहिती उपलब्ध झालेली नव्हती. तसेच सदरचे काम बरेच दिवस प्रतिवादी यांना नोटीस लागू होत नसल्याने तजवीर करणेवर असल्याने वादीकडून सदर वादी हे मयत असल्याबाबतची माहिती वकीलांना देणेत आली नव्हती. त्यामुळे वादी हे मयत आहेत व त्यांचे वारस रेकॉर्डवर आणावे लागते याची माहिती वादी यांना नसल्यामुळे वादी यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस विलंब झालेला आहे.

३ यातील प्रतिवादी यांनी आपले म्हणणेत असे कथन केले आहे की, वादी यांनी सदर कामी तुर्तातुर्त मनाई आदेश मिळविलेला आहे. सदरचा आदेश होवूनही

वादी यांनी मयताबाबत वेळेत तजवीज करून दिलेली नाही त्यामुळे सदर वादी विरूध्द अबेटमेंटचा आदेश झालेला आहे. सदर वादी व अन्य वादी हे एकाच गावातील रहिवाशी आहेत. त्यामुळे विलंबाकरीता दाखल केलेली कारणे चुकीची व लबाडीची आहेत. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा. तसेच अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास वादीने रक्कम रू. २,०००/— ची कॉस्ट प्रतिवादी यांना दयावी अशी विनंती केली आहे

४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

५. दावेचे निर्णयाच्या कामी सुलभता येण्यासाठी व वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद अंतिमरीत्या संपूष्टात येण्याच्या दृष्टीने हा अर्ज वादीवर रक्कम रू. ५००/— खर्च बसवून मंजूर करीत आहे.

६. वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालीलप्रमाणे आदेश केला आहे.

<u>आदेश</u>

१ सदरचा अर्ज वादी यांच्यावर रक्कम रू. ५००/— खर्च बसवून मंजूर करणेत आला.

सही/—

दिनांकः— २१/११/२०१८.

( यामीनी बोरावके )
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर
गडहिंग्लज.